



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १९९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.०१ मार्च २०२५

## थोडक्यात

### अल्पवयीन मुलीसोबत लग्न करून गर्भवती केले..

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, भंडारा :** कायद्याने विवाहाचे वय बंधनकारक केले असेल तरी आजही ग्रामीण भागात याबाबत पाहिजे तशी जागरूकता दिसून येत नाही.अशाच एका प्रकरणात अल्पवयीन युवतीशी विवाह करून तिला गर्भवती करणाऱ्या पतीवर गुन्हा दाखल झाल्याची घटना समोर आली आहे. अल्पवयीन मुलगी नऊ महिन्याची गर्भवती असल्याने नवरोबाला गोबरवाही पोलिसांनी अटक केली आहे.

पोलीस निरीक्षक शरद शेवाळे यांच्या तक्रारीवरून गुरुवार(दि.२७) रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गरोदर मातेच्या चाचण्या, वैद्यकीय तपासणी यादरम्यान पीडित मुलीचे बालविवाह झाल्याचे डॉक्टरांच्या निदर्शनात आले. अशावेळी कायद्याने मातृत्व चिकित्सा करण्याचे निर्बंध डॉक्टरांवर घातले आहे.प्रथम दर्शनी सदर गुन्ह्यात मुलीच्या पतीवर काय कारवाई करावी? याबाबत पोलीसही पेचात पडले होते. मात्र कायद्याच्या चौकटीत गुन्ह्याला पळवाट नसल्याने विवेक विनोद उईके (२०, बालाघाट मध्यप्रदेश) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्या विरुद्ध पोक्सो कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**बालविवाह प्रतिबंधक कारवाई**

सदरच्या गुन्ह्यात गोबरवाही पोलिसांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार घटनेचे गांभीर्य राखले आहे. लग्नाच्या वेळी तथा नऊ महिन्यांची गर्भवती राहिलेली पीडिता घटनेच्या तारखेपर्यंत देखील अल्पवयीनच आहे. त्यात सध्या आरोपी नवऱ्याला ताब्यात घेतले असून धार्मिक रीतीनुसार लग्न लावून देणाऱ्या दोन्ही बाजूच्या कुटुंबीयांना पोलिस ताब्यात घेणार की नाही? यावर अद्याप स्पष्ट माहिती मिळालेली नाही.

## गुप्तांगाला २८ टाके, शरीरावर असंख्य जखमा; ५ वर्षीय चिमुरडीवर अत्याचार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, मध्यप्रदेश :** एका ५ वर्षीय चिमुरडीवर तिच्या शेजारी राहणाऱ्या किशोरवयीन आरोपीने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना मध्यप्रदेशच्या शिवपुरी येथे घडल्याचा प्रकार उघडकीस आली आहे. ही घटना २२ फेब्रुवारी रोजी घडली असून पीडित मुलीवर ग्वाल्हेरच्या एका रुग्णालयात उपचार सुरू आहेत. येथे ती मृत्यूशी झुंज देत आहे. या अल्पवयीन पीडितेला शरिरातील अंतर्गत अवयवांना जखमा, चावल्याच्या, डोके भिंतीवर आपटल्याच्या याबरोबरच गुप्तांगाला २८ टाके अशा अनेक जखमा असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.



२२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पीडित मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या कुटुंबियांनी दिली होती आणि त्यानंतर दोन तासांनी ती आढळून आली.

तिच्या घरापासून जवळच एका बंद पडलेल्या घराच्या छतावर ही मुलगी बेशुद्ध आणि रक्तस्त्राव झालेल्या अवस्थेत आढळून आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ वर्षीय शेजारी दारूच्या नशेत मुलीला अमिष दाखवून घेऊन गेला आणि तिच्यावर अत्याचार केले. पीडित मुलीवर उपचार करणाऱ्या ग्वाल्हेरच्या कमला राजा रुग्णालयातील डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने पीडित मुलीचे डोके अनेक वेळा भिंतीवर आणि जमिनीवर आपटले, तिच्या चेहर्यावर आणि शरीरावर चावा घेतला आणि तिच्या गुप्तांगाचे जवळजवळ दोन भाग होतील इतक्या गंभीर जखमा केल्या.

रुग्णालयात दाखल करण्यात आल्यावर पीडितेच्या जीवघेण्या जखमांवर दोन तास ऑपरेशन करण्यात आले. डॉक्टरांना कृत्रिम गुदद्वार तयार करण्यासाठी तिचे मोठे आतडे कापावे लागले आणि युरीनरी कॅथेटर जोडावे लागले. सध्या मुलीची प्रकृती स्थिर असली तरी ती बेशुद्ध अवस्थेतच असून तिला क्रिटिकल केअरमध्ये ठेवण्यात आले आहे.

**कठोर शिक्षेची मागणी !**

दरम्यान पीडित मुलीच्या कुटुंबियांनी आरोपीला कठोरात-कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी केली आहे. पीडितेच्या आजोबांनी आरोपीला फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी केली आहे. तसेच पीडितेच्या कुटुंबियांनी आरोप केला आहे की आरोपी वयस्कर असून त्यांनी पोलिसांनी आरोपीची १७ वर्षीय अशी नोंद केल्याचा त्यांनी विरोध केला आहे.

२४ फेब्रुवारी रोजी या घटनेच्या विरोधात शिवपुरी येथे आंदोलन करण्यात आले, ज्यामध्ये नागरिकांबरोबर भाजपा आणि काँग्रेसच्या नेत्यांनी देखील सहभाग घेतला होता. येथील खासदार आणि केंद्री मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी या घटनेचा सोशल मीडियावर निषेध केला आहे तसेच कायद्या अंतर्गत कठोर कारवाई केली जाईल असे आश्वासन देखील त्यांनी दिले आहे.

आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे आणि त्याच्यावर बाल गुन्हे कायद्यांतर्गत खटला चालवला जाईल. आरोपीचे अचूक वयाबाबत तपास केला जात आहे. भारताच्या बालगुन्हेगार कायद्यांतर्गत, १६-१८ वयोगटातील व्यक्तींवर गंभीर गुन्ह्यांसाठी प्रौढ म्हणून खटला चालवता येतो. याबद्दल पीडितेच्या कुटुंबियांकडून मागणी केली जात आहे.

## बंजारा समाजाच्या प्रश्नांची जाण अडचणींना दूर करण्याचा पूर्ण प्रयत्न : लोकसभा अध्यक्ष ओम बिरला

**दि.२८, नवी दिल्ली :** बंजारा समाज हा संस्कृती आणि संस्कार जपणारा आहे. माझ्या मतदार संघात या समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात असून यांच्या प्रश्नांची मला जाण आहे. या समाजाच्या ज्या देशव्यापी अडचणी आहेत त्या दूर करण्याचा मी निश्चित प्रयत्न करेल, असे प्रतिपादन लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी आज येथे संत सेवालाल यांची २८६ वी जयंती कार्यक्रमाप्रसंगी केले.

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अंतरराष्ट्रीय सभागृहामध्ये आज संत सेवालाल चॅरीटेबल ट्रस्टच्यावतीने 'बंजारा महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले. याअंतर्गत संत सेवालाल यांची २८६ वी जयंती आणि रूप सिंग महाराज जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी श्री बिरला बोलत होते.



श्री बिरला पुढे म्हणाले, संत सेवालाल यांनी मानवतेसाठी संदेश दिला आहे. भारतीय संस्कृती आणि संत परंपरेला जगले आणि जगविले. हा समाज मोठया प्रमाणात आधी जंगलात राहायचा. पर्यावरण संवर्धनाचे काम मोठया प्रमाणात या समाजानेच केले आहे. स्वत:च्या गरजा सीमित ठेवून निर्सगाला वाढविण्याचे काम या समाजाने केले आहे. गुरू शिष्य परंपरा टिकवून हा समाज पुढे जातो असेही श्री बिरला म्हणाले.

राजस्थानमधील कोटा या आपल्या मतदार क्षेत्रात बंजारा समाजाची संख्या मोठी असल्याचे सांगत श्री बिरला म्हणाले, त्यांच्या अडचणींची जाण आहे. बंजारा समाजाची बोलीभाषा, खानपान, वेशभुषा एक समान असूनही वेगवेगळया राज्यात वेगवेगळया वर्ग घटकात हा समाज मोडतो. त्याचा अभ्यास करून या समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

तरुण पिढीला शिक्षण घेऊन पुढे येण्याचे आवाहन करत श्री बिरला पुढे म्हणाले, हा समाज देशभर कुठेही जाऊन व्यवसाय करू शकतो, हे या समाजाचे गुण वैशिष्ट्य आहे. श्री बिरला यांनी महाराष्ट्र शासनाने बंजारा समाजाची लोक पंरपरेवर आधारीत संग्रहालय बनवून त्यांच्या या पंरपरेला जोपासण्याचे आणि पुढच्या पिढीपर्यंत पोहचविण्याचे मोलाचे काम केले असल्याबद्दल कौतुक केले.

## ठाण्यात हातात तलवारी, कोयते घेऊन हल्लेखोरांचा धुमाकूळ



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, ठाणे :** ठाण्यातील वर्तक नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये एका कार्यालयात काही तरुण तलवारी, कोयते हातात घेऊन तेथील व्यक्तींना मारहाण करत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाचे सीसीटीव्ही संपूर्ण ठाण्यात समाज माध्यमातून प्रसारित झाल्याने शहरातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

ही घटना वर्तक नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असा प्राथमिक अंदाज पोलिसांचा आहे. त्यानुसार वर्तक नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करत आहे. या व्हिडिओमध्ये पाच ते सहा जण एका कार्यालयामध्ये शिरताना दिसत आहे त्या कार्यालयामध्ये सात ते आठ संगणक होते. दोन तरुण त्या कार्यालयामध्ये असताना हातामध्ये कोयते, तलवारे घेऊन तरुण शिरले आणि त्यांनी त्या कर्मचाऱ्यांना मारहाण सुरू केली. त्यानंतर त्या तरुणांनी कार्यालयातील संगणकांची नासधूस केली. एक व्यक्ती आल्यानंतर हे सर्व हल्लेखोर तेथून निघून गेले. या घटनेचे चित्रीकरण कार्यालयातील सीसीटीव्ही मध्ये कैद झाले आहे. त्या हल्लेखोरांनी जाताना सीसीटीव्ही कॅमेरा देखील फोडला आहे. या घटनेचे सीसीटीव्ही चित्रीकरण शहरात समाज माध्यमाद्वारे प्रसारित झाल्यानंतर एकच खळबळ उडाली. वागळे इस्टेट, श्रीनगर आणि वर्तक नगर पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरु झाल्या नंतर हे प्रकरण वर्तक नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे त्यानुसार वर्तक नगर पोलीस ठाण्यात पुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. हल्ले करतो चाकी न्यायालय असावे असा अंदाज पोलिसांना आहे. पूर्व वैमन्यासातून हा हल्ला झाला असावा असा अंदाजही व्यक्त केला जात आहे.

## पुणे बलात्कार प्रकरणातील आरोपीला १२ दिवसांची पोलीस कोठडी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, पुणे :** पुण्यातील स्वारगेट एसटी स्थानकावर उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर मंगळवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास बलात्कार झाला. बलात्कारानंतर हा आरोपी जवळपास तीन दिवस पोलिसांना चकवा देत होता.

अखेर सीसीटीव्ही फुटेज, श्वान पथक आणि ड्रोनच्या सहाय्याने पोलिसांनी आरोपीला गुणाट या गावातून मध्यरात्री अटक केली. यानंतर आरोपीला आज पुणे सत्र न्यायालयासमोर हजर करण्यात आले. दरम्यान या प्रकरणाच्या पुढील तपासासाठी आरोपीला पुणे न्यायालयाने १२ दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे. पुण्यातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या स्वारगेट बसस्थानकात महिलेवर अत्याचार झाल्याची घटना उजेडात आल्यानंतर याविरोधात सर्व स्तरांमधून संताप व्यक्त केला जात होता. विरोधकांकडून राज्य सरकार आणि पोलीस प्रशासनावर टीका केली जात होती. या दरम्यान आरोपी दत्तात्रय गाडे याला अटक करण्यात पोलिसांना यश आले.

**पोलिसांनी काय सांगितले?**

एसटी स्थानकातील २३ सीसीटीव्ही कॅमेरा आणि स्थानकाबाहेरील ४८ सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर दीड ते दोन तासांत आम्ही आरोपीची ओळख पटवली होती. गेल्या दोन दिवसांपासून आम्ही आरोपीच्या गावात जावून शोधमोहिम घेत होतो. पण आरोपी तेव्हा सापडला नाही. अखेर तो आज सापडला आहे. याकरता मी गावातील नागरिकांचे धन्यवाद देतो. त्या गावात भेट देऊन नागरिकांचा सत्कार करणार आहोत. तिथे ज्या-ज्या लोकांनी मदत केली, त्यांचं विशेष अभिनंदन करणार आहोत, असं पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार भावना आरोपीच्या अटकेनंतर व्यक्त केली.



शेवटच्या माहितीवरून आम्ही आरोपीला पकडलं. शेवटची माहिती आली की तो कुठेतरी पाणी पिण्यासाठी आला होता. तो कोणालातरी दिसला आणि मग तो तिथून पळाला. ड्रोनच्या सहाय्याने जी दिशा दिसली, त्यातून त्याला अटक करण्यात आली. ज्याने शेवटची माहिती दिली, त्याला एक लाखांचं बक्षिस देण्यात येणार आहे. त्याव्यतिरिक्त गावासाठी काय करता येणार, याचाही आम्ही विचार करणार आहोत, असेही अमितेश कुमार यावेळी म्हणाले.

**आरोपीकडून आत्महत्येचा प्रयत्न**

पुणे बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती समोर येत आहे. या संदर्भात बोलताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, असं आहे की या प्रकरणातील सर्व गोष्टी तपासात समोर आल्यानंतर त्यावर सविस्तर बोलणं योग्य आहे. आता पोलिसांनी आरोपीला अटक केलं आहे. त्यानंतर आरोपीला आज न्यायालयात हजर केलं जाईल. त्यानंतर आरोपीची चौकशी होईल. तसेच काही टेक्निकल डिटेल्स आमच्याकडे आलेल्या आहेत. तसेच काही फॉरेन्सिक डिटेल्स देखील आलेल्या आहेत. याची सर्व माहिती एकत्र करून याबाबत बोलणं योग्य राहील.

## संपादकीय



### महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर...

राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विद्येचे माहेरघर आणि सुसंस्कृत शहर अशी ओळख असलेल्या पुण्यातील गजबजलेल्या आणि सर्वाधिक वर्दळ असणाऱ्या स्वारगेट बस स्थानकात एका सराईत गुन्हेगार असलेल्या नराधमाने बस स्थानकातच उभ्या राहिलेल्या शिवशाही बसमध्ये एका सव्वीस वर्षीय तरुणीवर बलात्कार केला. स्वारगेट सारख्या वर्दळीच्या बस स्थानकात घडलेल्या या घृणास्पद घटनेने संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. पुण्यासारख्या देशाच्या सांस्कृतीक राजधानीत आणि विद्येच्या माहेरघरात एका तरुणीची अब्रू लुटली गेल्याने पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराची मान शरमेने खाली झुकली आहे. एकेकाळी पुणे हे मुलींसाठी सर्वात सुरक्षित शहर समजले जात होते मात्र मागील काही वर्षापासून पुण्याची ही ओळख पुसली जात आहे. या घृणास्पद घटनेने केवळ पुण्याचीच नव्हे तर पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकली आहे. पुण्यात घडलेली ही महिला अत्याचाराची घृणास्पद घटना ही काय राज्यातील पहिली घटना नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी बातमी हमखास वाचायला मिळते. दोन वर्षापूर्वी पहाटे कामावरून घरी परतणाऱ्या एका संगणक अभियंता तरुणीवर रिक्षा चालकाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पुण्यातीलच वानवडी परिसरात घडली होती. त्याआधी मुंबईतील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीचा विनयभंग करून सुरक्षा रक्षकाने तिची हत्या केली होती. पुण्यातच एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनीची हत्या झाली होती. मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनसहुन वाशिकडे हार्बर रेल्वेने परीक्षेसाठी येणाऱ्या वीस वर्षीय तरुणीवर एका नराधमाने मज्जीद बंदर जवळ धावत्या डब्यातच लैंगिक बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपर्डी येथील निर्भयावर झालेल्या अत्याचाराने तर संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला होता.बदलापुरात चार वर्षीय चिमुरडीवर शाळेतच झालेल्या अत्याचाराने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. बदलापुरची घटना तर मानवतेला काळीमा फासणारी होती. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात अशा घटनांची मालिकाच सुरू आहे. राज्यात महिला अत्याचाराची घटना घडली सर्वत्र संतापाची लाट उसळते. मोर्चे निघतात. निषेध व्यक्त होतो. इलेक्ट्रॉनिक मिडियात चर्चा होते. प्रिंट मीडियात अग्रलेख लिहिले जातात. राजकीय पक्ष एकमेकांवर आरोपांच्या फैरी झाडतात. शासनाकडून घटनेच्या चौकशीचे आणि पोलिसांकडून आरोपींना कठोर शिक्षा देण्याचे आश्वासन दिले जाते अर्थात घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडुन शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नये यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. दिवसाढवळ्या महिलांची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नाराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे. दिवसाढवळ्या अशा प्रकारचे गुन्हे करण्याची हिंमत नराधमांमध्ये निर्माण होते याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि राज्यातील सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही. पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना आपण वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहे म्हणूनच ते असे मानवतेला काळिमा फासणारे कृत्य करत आहेत. शिव, शाहू फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना शोभणीय नाहीत. पुरोगामी महाराष्ट्रालाशरमेने खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे हीच मानसिकता यामागे कारणीभूत आहे. आज राज्यातील कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलीस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पूर्वी अशा घटनांसाठी बिहार आणि उत्तरप्रदेश ही राज्ये प्रसिद्ध होती आता त्यात महाराष्ट्राची भर पडते की काय अशी शंका येऊ लागली आहे. महाराष्ट्राचा बिहार, उत्तरप्रदेश होऊ नये यासाठी सरकारने आणि पोलीस दलाने महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात तसेच संबंधित गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या नराधमांना फाशीचीच शिक्षा द्यायला हवी तसे झाले तरच राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांना आळा बसेल आणि पुरोगामी महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख कायम राहील.

# ‘माय मराठी’च्या सन्मानासाठी...




नुकताच मराठी राजभाषा दिवस पार पडला, दरवर्षी २७ फेब्रुवारीला कवी वि.वा. शिरवाडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने मराठी राजभाषा दिन राज्यात सर्वत्र उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी आणि या दिवसाच्या निमित्ताने सर्वत्र मराठीचा बोलबाला असतो, मराठीत स्वाक्षरी करण्याच्या मोहीमा राबवल्या जातात, मराठी बोलण्याचा अट्टाहास केला जातो, मराठी पाट्यांचा प्रश्न ऐरणीवर येतो, मराठीतून शुभेच्छा देण्याचे आवाहन केले जाते. मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने यंदाचा उत्साह यापूर्वीपेक्षा अधिक दिसून आला. मात्र हा दिवस सरला की पुढे वर्षभर कोणी मराठीविषयी काहीच बोलताना दिसत नाही, त्यामुळे मराठी भाषाभिमानही अन्य ’डेज’प्रमाणे केवळ एक दिवसापुरता सीमित राहिला आहे. मराठी भाषा बोलणारे देशभरात सुमारे नऊ कोटी तर भारताबाहेर अडीच कोटीहुन अधिक लोक आहेत. भारतात चौथ्या क्रमांकाची तर जगात दहाव्या क्रमांकाची भाषा म्हणून मराठीला गौरविले जाते. .

आज मराठी भाषेला महाराष्ट्रातच घरघर लागली आहे याचे कारण आपलाच व्यवहारातील मराठीचा वापर कमी होत चालला आहे. एकीकडे मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत, तर दुसरीकडे इंग्रजी माध्यमांच्या आणि कॉन्व्हेंट शाळांना अच्छे दिन आले आहेत. पाल्यांवर लहानपणापासून इंग्रजीची सक्ती करून आपण केवळ मराठीला डावलतो आहोत असे नव्हे, तर पाल्यांचा बौद्धिक विकासही खुंटत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ? जेव्हा व्यवहाराची आणि शिक्षणाची भाषा एक असते तेव्हाच त्या भाषेचे वैभव आणि त्यातील शब्दसंपदा, खऱ्या अर्थाने आपल्या लक्षात येऊन ती भाषा आपल्या भाव भावना व्यक्त करण्याचे, संवेदना जाणून घेण्याचे, विचार व्यक्त करण्याचे साधन बनते. आजमितीला चारचौघांत इंग्रजी भाषेत संभाषण साधने प्रतिष्ठेचे समजले जाते. प्रतिष्ठेची ही व्याख्या आपणच तयार केली आहे ना ? आपल्याला फारसे इंग्रजी येत नाही म्हणून महाराष्ट्रात मराठी माणूस न्यूनगंड बाळगू लागला आहे. इंग्रजी भाषेत अस्खलित बोलण्यास शिकवणाऱ्या शिकवण्या जागोजागी तयार होऊ लागल्या आहेत त्यामध्ये मोठ्या संख्येने मराठी तरुणच दिसून येतात. ही गरज कोणी निर्माण केली ? शाळांमध्ये मुलांना भरती करण्याआधी त्यांच्या पालकांना इंग्रजी येते का हे पाहण्यासाठी प्रथम पालकांच्या मुलाखती घेतल्या जातात. अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये नव्याने नोकरीस लागणाऱ्या मराठी माणसाला आज इंग्रजी मुलाखतीला सामोरे जावे लागते.

साधे सिम कार्ड घ्यायचे झाले, तरी त्याचा अर्ज इंग्रजीत भरावा लागतो. महाराष्ट्रात कुठल्याही क्षेत्रात आणि कोणत्याही संदर्भात निवेदन द्यायचे असेल किंवा अर्ज भरायचे असतील, तर त्यासाठी प्रथम पर्याय मराठीचाच असायला हवा ही सक्ती महाराष्ट्रात का केली जात नाही. आज मॉल किंवा सुपर मार्केट या ठिकाणी ग्राहकांशी नीट संवाद साधता यावा यासाठी हिंदी आणि इंग्रजी चांगले येणाऱ्या तरुण तरुणींना नोकरीवर ठेवले जाते त्यासाठी त्यांना अधिक वेतन दिले जाते त्यामुळे अशा ठिकाणी मराठी मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. ही स्थिती कोणी निर्माण केली ? महाराष्ट्रात राहायचे तर मराठी यायलाच पाहिजे. नीट बोलता नाही आले, तरी मराठी समजायला तर हवेच. आपल्या मातृभाषेला आलेल्या या अवकळेला आपण मराठी भाषिकच कारणीभूत आहोत. आपल्या मातृभाषेविषयी आपली अशीच उदासीनता राहिली, तर पुढच्या पिढीवर मातृभाषेचे संस्कार कसे होतील ? आज मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत.

घरोघरी आई, बाबा, काका, मामा या गोड नात्यांची जागा आता मम्मा, डॅडा, आंटी, अंकलने घेतली आहे. मुलांना असे म्हणण्यास पालकांकडूनच प्रवृत्त केले जात आहे. मराठी सणांचे महत्व कमी होऊन फेब्रुवारीतील ’डेज’ उत्साहाने साजरे होऊ लागले आहेत, नाताळात घरोघरी ख्रिसमस ट्री येऊ लागले आहेत, मराठी घरात नववर्ष गुढीपाडव्यापेक्षा एक जानेवारीला अधिक उत्साहाने साजरे होऊ लागले आहे. घरोघरी वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार तिथींना नव्हे तर इंग्रजी तारखांना साजरे होऊ लागले आहेत.

मराठी भाषेला जपायचे असले तर सर्वप्रथम मराठी संस्कृती आणि मराठी अस्मिता जपणे अधिक महत्वाचे आहे आणि त्याची सुरुवात प्रत्येक मराठी माणसाने स्वतःपासून आणि आपल्या कुटुंबापासून करायला हवी. ’मराठी बोला, मराठी जगा आणि मराठी वागा’ या नीतीचा अवलंब राज्यात सर्वच ठिकाणी केला गेला तरच येणाऱ्या काळात मराठी भाषेला तिचे पुनर्वैभव प्राप्त होईल.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# कानगाव शाळेत रंगला कलाविष्कार!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, पुणे :** विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देणारे हसते खेळते व्यासपीठ तसेच मान्यवरांचा स्नेहभाव जपणारे वार्षिक स्नेहसंमेलन कानगाव (तालुका दौंड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात गणेश वंदना, राष्ट्रभक्तीपर गीते, शेतकरी नृत्य, भूपाळी गीत, कोळी गीत यासह हिंदी, मराठी गाण्यांवर बहारदार नृत्य करून विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सदर केला.




यावेळी यावेळी राजं आले रे आले आणि झुलवा पाळणा बाल शिवाजीचा.... या गीतांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर नाटकाला प्रेक्षकांनी दाद दिली तर शिक्षकांनी साभिनय सादर केलेल्या जवानाचे आईस शेवटचे पत्र या कवितेने प्रेक्षक भावूक झाले. लुंगी डान्स, माझ्या पप्पांनी गणपती आणला, कान्हा धिंगाणा, ओम शांती ओम, आज है पार्टी, नऊवारी साडी या गीतांना प्रेक्षकांनी दाद दिली. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक शामराव जगताप, राजेंद्र जगताप, श्याम ठाणेदार, सखाराम खोमणे, एकनाथ हराळ, प्रकाश लकडे, संध्या कुंभार, शोभा कोष्टी या शिक्षकांनी केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन भाऊसाहेब फडके (राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार), व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण कोऱ्हाळे यांच्या हस्ते झाले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष योगेश चौधरी, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष रोहिदास गवळी, नानासाहेब कोऱ्हाळे, ज्ञानेश्वर हरगुडे, धनंजय कुंभार, संदेश शिंदे, डॉ बापूराव फडके, उमेश गवळी, निलेश गवळी, बाळकृष्ण फडके, डॉ. भारतीताई फडके, अर्चना कोऱ्हाळे, दिपाली कुंभार, सीमा फडके यांच्यासह अनेक मान्यवर तसेच ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी व परिसरातील शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसचालन एकनाथ हराळ यांनी केले.

### मोहीम..

आरोपी होतागायब
जोरा तपास मोहीम
दिसेलत्याला सतावे
प्रत्येकांबद्दल वहिम

वरुन सुटला आदेश
कर्तव्य आहे अग्रीम
आता विश्राम मिळे
कार्यसंपन्नते अंतिम

असे खलनिग्रहणाय्
सेवाभाव रे निस्सीम
आम्ही सद् रक्षणाय्
जाणीव अति इशीम्

संपूर्ण शक्ती एकवटे
सोडा व्यापार उदीम
अन्य कामे बास्तन्यां
पळत सुटले खादिम

कर्तव्य जाण जागवे
जिम्मेदारी हीअसिम
सर्व पक्षीयं झपाटले
लुटू पाही आईस्क्रीम

सापडे अंति आरोपी
रंगवे आपले लेझीम
स्पर्धा श्रेय लाटायला
पेटवे आपले चिलीम

विसरले कृत कर्तृत्व
गाजे आपलीतालीम
देतचं राहता उपदेश
उपायकरावे जालीम

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक बातमी ... बातमी

# मुंबई मराठी वृत्तपत्र लेखक संघाचा पारितोषिक वितरण समारंभ...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, मुंबई :** मुंबई मध्ये गेल्या ७५ वर्षांपासून कार्यरत असलेल्या मुंबई मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने मराठी दिनानिमित्त गुरुवारी दादर येथील धुरु हॉल येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जेष्ठ पत्रकार सचिन परब तसेच कामगार नेते दिवाकर दळवी, राहुल जोगळेकर, एकनाथ आव्हाड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांच्या हस्ते द्विपप्रज्लन करण्यात आले. यावेळी चारुशीला बेलसरे यांनी कुसुमाग्रजांच्या दोन कविता सादर केल्या. अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी संस्थेमार्फत केल्या जाणाऱ्या सामाजिक कामांची माहिती दिली. यावेळी स्पर्धेच्या निमित्ताने आलेल्या लेखांचे एक पुस्तक करुन ते शासनाकडे देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. दिवाळी अंकाची स्पर्धा गेल्या पन्नास वर्षांपासून आयोजित करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. विषेश म्हणजे दिवाळी अंक स्पर्धेसाठी विदेशातून देखील दिवाळी अंक आले होते.कामगार नेते दिवाकर दळवी, एकनाथ आव्हाड, सचिन परब या मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. गेल्या तीस वर्षांहुन अधिक काळ संगणक क्षेत्रात अध्यापन करणारे प्रा. भानुदास साटम यांचे ’कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय तंत्रज्ञान) मराठी भाषेसाठी किती ऊपयुक्त ’या विषयावर भाषण करतांना एआय ची ओळख आणि वैयक्तिक किंवा व्यवसायायिक वापरातील महत्व याबाबत विस्तृत माहिती दिली. एआय चे भवितव्य काय त्याचे धोके काय याबाबत त्यांनी माहिती दिली.

मुंबई मराठी वृत्तपत्र लेखक संघ, धुरु हॉल ट्रस्ट तसेच दादर सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने २०२४ मधे सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक तसेच’ अभिजात मराठी भाषा चला करु या ज्ञानभाषा’ या विषयावर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. नवलाई – सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक, निसर्गोत्सव, कोकण साद, संस्कार भक्तीधारा, शब्द शिवार, सृजनदीप, सुवर्ण धन, चांगुलपणाची चळवळ, ऊद्याचा मराठवाडा, नवभारत, कला सागर, द ईनसाईट पुणे,ठाणे नागरिक, गावगाथा, बृहन्महाराष्ट्र वृत्त, शुतुपर्ण, अक्षर मुद्रा, दक्षता, वारसा, आदी पन्नास दिवाळी अंकांना पुरस्कार देण्यात आले. तर मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय या संस्थेला मराठी भाषा जतन करण्यासाठी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अभिजात मराठी भाषा चला ज्ञानभाषा करू या’ या स्पर्धेतील विजेते अर्चना शुक्ला – प्रथम क्रमांक, रश्मी फडणवीस – द्वितीय क्रमांक, स्वामिनी निष्कालानंद – तृतीय क्रमांक,तर डॉ प्रभाकर चांदरे, प्रा यशवंत सुरोशे सर, मनोहर जोगळेकर, अनंत बोरसे, सूर्यकांत भोसले, प्रशांत शिरुडे, वर्षा झाबरे कामिनी खाने, सर्वांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. दिवाळी अंक स्पर्धेसाठी दत्ता मालप, सुनील सुर्वे यांचे तर लेख स्पर्धेसाठी सदानंद यादव यांचे विशेष सहकार्य लाभले.

रविंद्र मालुसरे हे गेल्या अनेक वर्षांपासून संस्थेच्या अध्यक्षपदाची तर रमेश सांगळे (कार्याध्यक्ष), प्रशांत घाडीगावकर (प्रमुख कार्यवाह), आत्माराम गायकवाड (कोषाध्यक्ष), नितीन कदम (कार्यवाह) धुरा सांभाळत आहेत. विजय ना. कदम हे पदसिद्ध सदस्य तर पंकज पाटील, अरुण खटावकर, सुनील कुवरे, केतन भोज असे अनेक संस्थेचे कार्यशील सभासद आहेत. प्रास्ताविक प्रशांत घाडीगावकर यांनी केले. तर दिगंबर चव्हाण यांनी ऊपस्थितांचे आभार मानले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नासिक ग्रामीण पोलिस यंत्रणे पुढे बांगलादेशीयांचे आव्हान



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२८, विंचूर (नाशिक) :** भाजप नाशिक जिल्हा अध्यक्ष शंकरराव वाघ व निफाड तालुक्याच्या व इतर भाजप पदाधिकाऱ्यांनी बांगलादेशी घुसखोरा विरुद्ध नाशिक जिल्हा ग्रामीण पोलीस प्रमुख यांना दिले निवेदन. निवेदनात असे म्हटले आहे की, मागील काही महिन्यापूर्वी नाशिक महानगर आयुक्तांनी काही बांगलादेशीय घुसखोर यांना शहरातून ओळखून बाहेर काढले होते. नासिक ग्रामीणमध्ये मालेगाव शहरात काही बांगलादेशीय घुसखोर सापडले, सिन्नर औद्योगिक वसाहतीत काही घुसखोर सापडले, कोणाच्याही मनी ध्यानी नसताना देवळ्यात बांगलादेशीय महिला मिळाल्या. नासिक ग्रामीण पोलिस दलातील गोपनीय नावाचे एक विभाग आहे. सरासरी विदाउट गणवेशात ही पोलिस यंत्रणा काम करीत असते. त्या गोपनीय अधिकारी व कर्मचारी यांनी आपला स्वतंत्र अहवाल वरिष्ठांना देणे अपेक्षित असावे. पण आज दिसते ते काय, कळवण पोलिसांना हवा सुद्धा लागू न देता जिल्ह्यातील समांतर व्यवस्था कळवण परिसरात मटका अड्डा उध्वस्त करतात.स्थानिक पोलिसांना त्याचा मागमूस लागत नाही. किती बेपर्वाई. देवळ्यात नुकतीच धाड पडली.वेश्या व्यवसाय करताना काही महिला सापडल्या. त्या ही बांगलादेशी ही अत्यंत गंभीर बाब आहे.पैशासाठी देशाशी गद्दारी. ज्या अधिकाऱ्यांनी ही बाब उघडकीस आणली त्या बहाद्दर पोलिस अधिकाऱ्यांचे व सहकारी पोलिस यांचे अभिनंदन. हिंदुना जगाच्या पाठीवर रहाण्यासाठी एकच देश आहे तो म्हणजे भारत. आम्हा भारतीय यांचे पण एक कर्तव्य आहे. आमच्या परिसरात आजू बाजूला जे परदेशी नागरिक लक्षात आले ते जवळच्या पोलिस यंत्रणेस कळवावे. भाड्याने खोली देणारे घरमालक यांनी पण खात्री केल्यानंतर खोली भाड्याने द्यावी. अनेक महाभाग हिंदू नाव घेऊन घर भाड्याने घेतात. काही लालची पोलिस अधिकारी जर ठरवून दुर्लक्ष करीत असतील तर या पुढे खैर नाही. परप्रांतीय नागरिक नासिक ग्रामीण मध्ये निवास करण्यास आमची कोणतीही हरकत नाही, मात्र त्याची नोंदणी जवळच्या पोलिस स्थानकात झालीच पाहिजे. अन्यथा भाड्याने खोली, रूम, बंगला देणाऱ्या घर मालक हे जर घुसखोर त्यांना अभय देणारे यांचेवर देशद्रोहाचा गुन्हा तात्काळ दाखल करावा. अशी विनंती नंदकुमार खैरनार महामंत्री भाजप नासिक जिल्हा यांनी केली आहे.


## एसएससी विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी परिवहन उपक्रमाकडून विशेष बसगाड्यांची व्यवस्था



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२८, नवी मुंबई (ठाणे) :** सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील एसएससी बोर्डाच्या परीक्षा सुरू झाल्या असून विद्यार्थ्यांच्या परिक्षा केंद्रावर जाताना व येताना गैरसोय होवू नये. यासाठी परिवहन उपक्रमाकडून विशेष बसगाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर बसगाड्या नवी मुंबई क्षेत्रात ऐरोली ते वाशी रेल्वे स्थानक, घणसोली ते सानपाडा रेल्वे स्थानक, सिबीडी बस स्थानक ते वाशी सेक्टर-७ या दरम्यान कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांनी सदर सेवेचा लाभ घ्यावा. असे आवाहन परिवहन उपक्रमामार्फत करण्यात आले आहे.

## मराठी भाषा दिनानिमित मनसेकडून दिव्यात मराठी स्वाक्षरी अभियान




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२७, दिवा (ठाणे) :** दिनांक २७ फेब्रुवारी हा कुसुमाग्रजांचा वाढदिवस हा जागतिक अभिजात मराठी भाषा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने महाराष्ट्र नवनिर्माण सेना दिवा शहर तर्फे दिवा रेल्वे स्टेशन येथील रिक्षा स्टॅण्ड जवळ मी मराठी, माझी स्वाक्षरी मराठी हे अभियान घेण्यात आले. यावेळी दिवा शहरातील नागरिकांनी या स्वाक्षरी मोहिमेत अतिशय उत्साहात सहभाग नोंदवला.

## मराठी भाषा गौरव दिन साजरा



**अक्षराज : विजय चव्हाण**

**दि.२७, जळगाव :** के.सी.ई.सोशिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्रम हाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनसाजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवातवि. वा.शिरवाडकर यांच्याप्रतिमा पूजनाने करण्यात आली.मराठी भाषाविभाग प्रमुखआणि कार्यक्रमाचे प्रास्ताविकप्रा.डॉ स्वाती चव्हाणयांनी केले. कार्यक्रमात कवितावाचन गायन आणि मराठीसंस्कृती वेशभूषा कार्यक्रम घेण्यात आले. यात पल्लवीपाटील,प्रतीक्षा पाटील,प्रणिता सुरवाडकर,दीप्ती वानखेडे,सारिका गिरासे या विद्यार्थ्यानी भागघेतला. प्रा.संभाजी जमधडे यांनी आपल्या भाषणांतून मराठी भाषा दर बाराकोसावर बदलत असली तरीती बोली भाषा मराठीअसते. हे पटवून दिले. प्रमुख अतिथी वंदना तायडे,प. न.लुंकडशाळेतीलशिक्षिका लाभल्या. त्यांनी विद्यार्थानामराठी भाषेतील वेगळेपण,भाषेचा इतिहास,भाषेची महती पटवून दिली.कार्यक्रम अध्यक्ष प्राचार्य डॉ.अशोक राणेयांनी मराठी भाषेचे महत्त्व आणि तारा भवाळकर यांच्याभाषणाचा भाग ऐकवला आणिय च मु म ुक्तविद्यापीठाचे वि.वा. शिरवाडकरयाचे विद्यापीठ गीत ऐकवले. कार्यक्रमाचेआभार सारिका गिरासे हिने मानले. कार्यक्रमासर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

## नाशिक शहर, परभणी किशोरी/किशोर गटाचे नवे जेते

### पिंपरी चिंचवड दोन्ही गटात उपविजेते ठरले





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, मनमाड (परभणी) :** यजमान नाशिक शहर, परभणी यांनी ३५व्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतअनुक्रमे किशोरी व किशोर गटाचे विजेतेपद पटकावले. पिंपरी चिंचवड संघ दोन्ही गटात उपविजेता ठरला. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने नाशिक जिल्हा कबड्डी असो.च्या विद्यमाने मनमाड नाशिक येथील स्व.माणकचंद ललवाणी इस्टेट (हेलिपॅड) मैदानातील मॅट वर सुरू असलेल्या किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात यजमान नाशिक शहर चुरशीच्या लढतीत गतविजेत्या पिंपरी चिंचवडचा कडवा प्रतिकार ४३-३८ असा मोडून काढत स्व. सौ. राजश्री चंदन पांडे फिरता चषक व आम. सुहास (अण्णा) कांदे कायमस्वरूपी चषक आपल्या नावे केला. यजमान नाशिक शहर संघाला रोख रू.५ लाख रू. पारितोषिक बहाल करण्यात आले. सुरुवात झोकात करणाऱ्या नाशिकला पिंपरी चिंचवडच्या शिलकी ३ गड्यात गुण न घेता आल्याने नाशिकने आपल्या अंगावर लोण घेतला. मध्यंतराला पिंपरी चिंचवड कडे २०-१९ अशी आघाडी होती. हळू हळू ती वाढत गेली. पण विश्रांतीनंतर ७ व्या मिनिटाला लोण देत नाशिकने ३३-३० अशी आघाडी घेतली.येथून त्यांनी मागे वळून पाहिले नाही.

स्थानिक कबड्डी रसिकांच्या पाठिंब्यावर शेवटच्या मिनिटात आणखी एक लोण देत विजेतेपदावरील आपला दावा पक्का केला. शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठावर्धक ठरलेल्या या सामन्यात अखेर नाशिकने बाजी मारत पहिल्यांदाच किशोरी गटाचे जेतेपद मिळवण्याचा मान पटकाविला.बिंदिशा सोनाराच्या तुफानी खेळाला या विजयाचे खरे श्रेय जाते. तिला यात ईशा दारोळेची चढाईत तर हेतल हिरे, भुवनेश्वरी उर्दळ यांची पकडीची भक्कम साथ लाभली. पिंपरी चिंचवडच्या सोनाक्षी वाबळे, समृद्धी लांडगे, सिद्धी लांडे यांचा पूर्वार्धातील जोश उत्तरार्धात कोठे दिसलाच नाही. परभणीने किशोर गटाच्या अंतिम साम न्यात पिंपरी चिंचवडचा ४४-२४ असा एकतर्फी पराभव करीत स्व.नारायण नागो पाटील फिरता चषक व आम. सुहास(अण्णा) कांदे कायमस्वरूपी चषक आपल्या नावे केला.झंझावाती सुरुवात करीत सुरुवातीला दोन लोण देत परभणीने पूर्वार्धात २६-१२ अशी भक्कम आघाडी घेतली.उत्तरार्धात तोच जोश कायम राखत आणखी एक लोण देत सामना सहज खिशात टाकला. आर्यन पवार, किशोर जगताप यांच्या तुफानी चढाया त्याला सोमेश्वर खोसे याची मिळालेली बचावाची भक्कम साथ यामुळे हा विजय सोपा गेला. मनिषा किल्लयाच्या, विजय राठोड या पिंपरी चिंचवडच्या खेळाडूना या सामन्यात सुर सापडला नाही. या अगोदर झालेल्या किशोर गटाच्या उपांत्य सामन्यात परभणीने रत्नागिरीला ६२-२९ असे, तर पिंपरी चिंचवडने गतविजेत्या जालनाला ३९-३५ असे पराभूत करीत अंतिम फ ेरीत धडक दिली होती. स्पर्धेचे बक्षीस वितरण आमदार सुहास (आण्णा) कांदे, अंजुमताई कांदे, महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.चे मंगल पांडे, नाशिक जिल्हा कबड्डी असो.चे कार्याध्यक्ष राजाभाऊ पगारे, सचिव मोहन (अण्णा) गायकवाड यांच्या उपस्थितीत पार पडला.

## ठाण्यातील धक्कादायक घटना...

## रागाच्या भरात मित्राचा कान चावला नंतर तो गिळून टाकला

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२७, ठाणे :** ठाण्यातून अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे.हिरानंदानी इस्टेट येथे राहणाऱ्या ठाण्यातील एका व्यक्तीने बुधवारी रागाच्या भरात त्याच्या मित्राच्या कानाचा एक भाग चावला आणि नंतर तो गिळून टाकला. हिरानंदानी इस्टेट म धील सॉलिटेअर कोऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीम ध्ये पार्टी झाल्यानंतर ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित ३७ वर्षीय चित्रपट निर्माता श्रवण लीखा आणि ३२ वर्षीय आयटी व्यावसायिक दोघेही हिरानंदानी इस्टेटमध्ये राहतात. तक्रार मिळाल्यानंतर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

आरोपीला अद्याप पोलिसांनी अटक केलेली नाही.ही घटना एका पार्टी दरम्यान सुरू झाली. ज्याम ध्ये ३७ वर्षीय श्रावण लेखा आणि ३२ वर्षीय विकास मेनन हे त्यांच्या इतर मित्रांसह होते. सगळं व्यवस्थित चाललं होतं. पण अचानक दोघांमध्ये कशावरून तरी वाद सुरू झाला. वाद इतका वाढला की विकास मेनन हिंसक झाला. रागाच्या भरात त्याने श्रवण लिखाच्या कानाचा एक भाग दातांनी चावला.कान चावला आणि गिळला. वाद इथेच संपला नाही तर विकास मेननचा राग अनावर झाला आणि त्याने त्याच्या कापलेल्या कानाचा तुकडा ही गिळून टाकला.

या अनपेक्षित हल्ल्याने पार्टीत उपस्थित असलेले इतर लोकही थक्क झाले. जखमी श्रावण लेखाला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. घटने दरम्यान उपस्थित असलेल्या लोकांना स्वतः च्या डोळ्यांनी जे पाहिले त्यावर विश्वासच बसत नव्हता. दरम्यान या घटनेची माहिती मिळताच पोलीस कारवाईत आले आणि विकास मेनन विरुद्ध कासारवडवली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी सांगितले की, त्यांच्यावर भारतीय दंड संहितेच्या (इछड) कलम ११७ (२) अंतर्गत स्वेच्छेने गंभीर दुखापत केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलीस संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत आणि भांडणा मागील खरे कारण काय होते हे शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. आरोपी विकास मेननला अद्याप पोलिसांनी अटक केलेली नाही. पण पोलीस त्याला लवकरच पकडण्याचा प्रयत्न करीत आहेत.

रागाच्या भरात घेतलेले निर्णय किती भयानक वळण घेऊ शकतात हे या घटनेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. मित्रांमध्ये आनंदाचा प्रसंग असलेली एक साधी पार्टी. काही वेळातच त्याचे रूपांतर हिंसाचार आणि क्रूरतेत झाले. पोलीस आता या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत आणि आरोपीचा शोध सुरू आहे

## थकबाकीदार यांविरोधात महापालिकेची अटकावणी, जप्ती मोहीम अधिक तीव्र



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२८, पनवेल :** महापालिकेच्या मालमत्ता कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानूसार महापालिकेच्या वतीने उपायुक्त स्वरूप खरगे यांनी मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांच्या विरोधात अटकावणी व जप्ती मोहीम अधिक तीव्र केली आहे. या आदेशनूसार मालमत्ता कर न भरणाऱ्या नवीन पनवेलमधील औद्योगिक वसाहतीमधील टेक्नोपेट मशिनरी, मेरिडियन कंपनी व महापालिकेच्या वतीने अटकवणीची कारवाई करण्यात आली आहे. तसेच कामोठे येथील सुविधा कोल्ड स्टोरेजवरती अटकवणी कारवाई करण्यात आली आहे. महापालिकेच्या क्षेत्रातील औद्योगिक वसाहतीमधील थकीत मालमत्ता कर असणाऱ्या विविध कारखान्यांवरती व हॉटेल्सवरती अटकावणीची व जप्तीची कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध नोडमध्ये सुमारे ४४७ जप्तीपूर्वीच्या नोटीसा व २७ वॉरंट नोटीसांचे वाटप थकबाकीदार मालमत्ता धारकांना दिल्याने थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनूसार जप्ती मोहीम अधिक तीव्र केल्याने तळोजा औद्योगिक वसाहतीमधील विविध कंपन्याच्या माध्यमातून एका दिवसात सुमारे अडीच कोटीहून अधिक मालमत्ता कर वसूल करण्यात आला आहे.आता महापालिकेने थकबाकीदारांच्या विरोधात कठोर पावले उचलण्यास सरुवात केली आहे.

कर अधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली जप्ती कारवाई व वसुली कारवाईसाठी मनुष्यबळ वाढविण्यात येत आहे. वसुली कारवाईला गती देण्यासाठी येत्या दिवसांमध्ये वसुली टीममध्ये वाढ करण्यात येणार आहे.पनवेल महापालिका क्षेत्रात ३ लाख ५० हजार निवासी, बिगर निवासी, व्यावसायिक, औद्योगिक आदी नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून कर वसुलीसाठी महापालिकेचे विविध झोन तयार केले आहेत. तसेच ऑनलाईन आणि विविध ॲपच्या माध्यमातून कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी महापालिकेत न येता ऑनलाईन पध्दतीने भरता यावा यासाठी महापालिकेने 'सिटीझन प्रॉपर्टी टॅक्स पेमेंट गाईड' तयार केले आहे. महापालिकेने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'पीएमसी टॅक्स ॲप' मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहेदिनांक ३१ मार्च ही मालमत्ता कर भरण्याची शेवटची तारीख असून नागरिकांना मालमत्ता करभरणे सोयीचे व्हावे यासाठी मार्च महिन्यातील सर्व शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कर वसुली विभाग, लेखा विभाग, नागरी सुविधा केंद्र, पाणी कर संकलन विभाग, प्रभाग समिती अ,ब,क,ड, व नावडे उपविभाग सुरू राहणार आहे.

